महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्न आंदोलनातील हुतात्म्यांच्या वारसांना निवृत्ती वेतन व इतर आर्थिक लाभ.....
वित्तीय वर्ष २०१७-१८ मधील जून, २०१७ ते डिसेंबर, २०१७ या कालावधीकरीता अनुदानाचे वाटप.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : बियुडी-१८१७/९८/प्र.क्र.२९/२०१७/३६

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२

दिनांक : १९ जून, २०१७

संदर्भ :-

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बियुडी-१८१४/प्र.क्र.९६/२०१४/३६, दि.२१/०४/२०१५.

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीयुडी-२०१७/प्र.क्र.७०/२०१७/२५, दि.०५/०४/२०१७.

३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८/०४/२०१७.

४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीयुडी-१८१७/प्र.क्र.२९/२०१७/३६, दि.२०/०४/२०१७.

५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीयुडी-२०१७/प्र.क्र.७०/२५, दि. २०/०४/२०१७

शासन परिपत्रक :-

" **मागणी क्र.ए-५, २२३५** - सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६०-इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम - १०२ - सामाजिक सुरक्षा योजनेखाली निवृती वेतन - (००) (०३) महाराष्ट्र कर्नाटक सीमा आंदोलनातील हुतात्म्यांचे वारसांना निवृत्ती वेतन **(२२३५ २४९३)** " या लेखाशीर्षाअंतर्गत सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी **एकूण रु.१७,५७,०००/- (रुपये सतरा लक्ष सत्तावन्न हजार फक्त)** एवढी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे. त्यापैकी **माहे एप्रिल व मे, २०१७** या २ महिन्यांचा खर्च भागविण्याकरीता **रु.२,८७,०००/- (रुपये दोन लक्ष सत्याऐंशी हजार फक्त)** इतके लेखानुदान महाराष्ट्र-कर्नाटक सीमा आंदोलनातील हुतात्म्यांच्या वारसांना सुधारित दराने निवृत्तीवेतन व अन्य लाभ अदा करण्यासाठी संदर्भ क्र.३ येथील दि.२०/०४/२०१७ च्या परिपत्रकान्वये वितरित करण्यात आलेले आहे.

२. आता संदर्भ क्र.३ वरील वित्त विभागाच्या दि.१८/४/२०१७ च्या परिपत्रकान्वये, महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१७ (महाराष्ट्र-विनियोजन (लेखानुदान) अधिनियम,२०१७ मधील अनुसूचीच्या स्तंभ-४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमांसह) यांस विधानमंडळाने मंजुरी दिलेली असून सदर विधेयक सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-२६ म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४, **दि.१५/०४/२०१७** मध्ये प्रसिध्द केल्याचे निदर्शनास आणण्यात आले आहे. तसेच **सन २०१७-१८ या वित्तीय वर्षातील प्रथम नऊमाहीकरीता (डिसेंबर,२०१७ अखेर) आवश्यक असणारा अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतुदीच्या ८०% च्या मर्यादेत वितरीत केल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.**

३. संदर्भ क्र.३ वरील वित्त विभागाच्या दि.१८/४/२०१७ च्या परिपत्रकातील तरतुदी विचारात घेता एकूण अर्थसंकल्पीय तरतुद **रु.१७,५७,०००/-**च्या **८०%** एवढी तरतूद दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या कालावधीत वितरीत करण्यासाठी उपलब्ध असून त्यापैकी रु.२,८७,०००/- इतकी रक्कम दिनांक २०/४/२०१७ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकान्वये वितरीत करण्यात आली आहे. आता **दि.०१ जून, २०१७ ते दि.३१ डिसेंबर, २०१७** या उर्वरित ७ महिन्यांच्या कालावधीसाठी निवृत्तीवेतन व इतर आर्थिक लाभ अदा करण्यासाठी **रु.१०,५०,०००/- (रुपये दहा लक्ष पन्नास हजार फक्त)** ची रक्कम संबंधित जिल्हाधिकारी यांना पुढील कोष्टकात नमूद केल्यानुसार वितरीत करण्यात येत आहे.

अ. क्र.	जिल्हाधिकारी (लाभार्थ्यांची संख्या)	सन २०१७-१८ एकूण अर्थसंकल्पीय अनुदान (रुपये)	**०१ जून, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीसाठी वितरित केलेला निधी**			
			निवृत्तीवेतन (दरमहा रु.१००००/- प्रत्येकी प्रमाणे) प्रत्येक महिन्यासाठी वितरीत केलेले अनुदान (रुपये)	निवृत्तीवेतन ०१ जून,२०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ साठी एकूण वितरीत अनुदान (रुपये)	इतर आर्थिक लाभ (प्रत्येकी रु.५०००/- वार्षिक प्रमाणे) (जुलै, २०१७ मध्ये उपलब्ध) (रुपये)	एकूण वितरीत अनुदान (रुपये) (५ + ६)
१	२	३	४	५	६	७
१	मुंबई शहर (३)	--	३०,०००	२,१०,०००	१५,०००	२,२५,०००
२	कोल्हापूर (९)	--	९०,०००	६,३०,०००	४५,०००	६,७५,०००
३	पुणे (१)	--	१०,०००	७०,०००	५,०००	७५,०००
४	रत्नागिरी (१)	--	१०,०००	७०,०००	५,०००	७५,०००
	एकूण अनुदान	**१७,५७,०००**	**१,४०,०००**	**९,८०,०००**	**७०,०००**	**१०,५०,०००**

४. पूर्व पृष्ठावरील तक्त्यानुसार मंजूर करण्यात आलेले अनुदान खालील अटींच्या अधीन राहून वितरीत करण्यात येत आहे :-

१) **दि.०१ जून, २०१७ ते दि.३१ डिसेंबर,** २०१७ या ७ महिन्यांचा खर्च संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांना वितरीत केलेल्या तरतूदी इतका मर्यादित ठेवावा.

२) संबंधित जिल्हाधिकारी यांनी उक्त बाबीवर होणाऱ्या खर्चाची वेगळी नोंद ठेवून महालेखापाल कार्यालयामधील खर्चाच्या नोंदीशी दरमहा ताळमेळ घालून त्याचे विवरणपत्र सामान्य प्रशासन विभाग/ कार्यासन-२५ व वित्त विभाग यांच्याकडे विहित मुदतीत पाठवावे व त्याची प्रत या कार्यासनास देखिल पाठवावी. वितरीत करण्यात आलेला निधी **२२३५ २४९३** या लेखाशीर्षाखालीच खर्ची पडत असल्याची व त्याबाबत खर्चमेळाद्वारे खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

५. हे परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.बीयुडी-२०१७/प्र.क्र.७०/२०१७/२५, दि.२०/०४/२०१७ व वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१६/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८/०४/२०१७ मधील सूचना विचारात घेऊन निर्गमित करण्यात येत आहे.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१७०६१९१६०६४९०६०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Krishna Bhosale

Digitally signed by Sanjay Krishna Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=68fad25d7626a3cc798a2cdee2480a108e46d2bc3c24f98d38cc78723fe79c0f, cn=Sanjay Krishna Bhosale
Date: 2017.06.19 16:04:48 +05'30'

(सं. कृ. भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना :-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र- १, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र- १, मुंबई.
३. संचालक, लेखा व कोषागारे (संगणक शाखा), मुंबई-४०००३२.
४. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
५. सचिव, लेखा व कोषागरे, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.४०००३२-
६. जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा, जुने जकात गृह, फोर्ट, मुंबई-२३.
७. जिल्हाधिकारी, कोल्हापूर.
८. जिल्हाधिकारी, पुणे.
९. जिल्हाधिकारी, रत्नागिरी.
१०. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१ यांना असे कळविण्यात येते की, त्यांना आवश्यक असलेले अनुदान जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडून मागविण्यात यावे.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१३. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी.
१६. सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-२५, मंत्रालय, मुंबई.
१७. निवड नस्ती (कार्या.३६).